गुरुवार दि.१९ सप्टेंबर २०२४
किंमत २ रुपये । महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०२ अंक : १७
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक लोकनेता बीड

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

# लक्ष्मणअण्णा भाजप नकोच,तुतारी घ्या



## कार्यकर्त्यांच्या भावना,भाजपचे बॅनरही काढून फेकले

# पंडितांच्या घरातील एकही सदस्य निवडून येऊ देणार नाही-आ.पवार

## निर्णय मागे घेवून भुमिका जाहीर करा अशी मागणी करत कार्यकर्त्यांनी लक्ष्मण अण्णांना दिला १२ दिवसाचा वेळ

लोकनेता न्यूज नेटवर्क

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई मतदारसंघाचे भाजपाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी २०२४ ची गेवराई विधानसभा निवडणूकीतून माघार घेतल्याचे विधान केल्यानंतर आज कार्यकत्यांनी आ. लक्ष्मण पवार यांच्या निवासस्थानी बैवक बोलावली होती. या बैठकी मध्ये कार्यकत्यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी केली. यावेळी बोलताना आ. लक्ष्मण पवार यांनी गेल्या काही वर्षापासून होत असलेल्या त्रासाबद्दल खदखद व्यक्त केली. पालकमंत्र्यांनी संजय गांधी निराधार समितीसह सर्व समित्या बरखास्त करून गलिच्छ राजकारण केले. मानसिक खच्चीकरण करण्याचा प्रयान केला. पालकमंत्री भ्रष्ट कारभाराचा उत्तम नमुणा असल्याचा आरोप यावेळी आ.लक्ष्मण पवार यांनी केला. यासह गेवराई मतदारसंघाचे दोन्ही पंडितांनी वाटोळे केले आहे यामुळे यांच्या घरातील माणूस निवडणूक येवू देणार नाही तशी काळजी तुम्ही घ्या असे मत आ.पवार यांनी यावेळी व्यक्त केले. विशेष माणजे आ. लक्ष्मण पवार यांनी घेतलेला निर्णय घ्यावा, भाजप सोडून हाती तुतारी घ्यावी यासाठी कार्यकत्यांनी आ.पवार यांना बारा दिवसाचा कालावधी दिला आहे.

## लक्ष्मण पवार जनतेपर्यंत निधी पोहचविण्यासाठी कमी पडले म्हणून त्यांनी हा निर्णय घेतला-कृषीमंत्री मुंडे



गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवणार नसल्याचा निर्णय घेतल्यावर पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या वर वेगवेगळ्या प्रकारचे आरोप केले आहेत. याचे प्रतिउत्तर देताना धनंजय मुंडे असे म्हणाले की, आ. लक्ष्मण पवार हे मिळालेला निधी व काम जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी कमी पडले असावे याच दु:ख त्यांना निवडणूकीच्या तोंडावर होत असावं, त्यांनी जर मतदार संघात काम केले असते तर लोकसभा निवडणुकीत त्यांच्या मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवाराला लीड मिळाली असती असेही यावेळी माध्यमांशी बोलताना पालकमंत्री धनंजय मुंडे म्हणाले.

## रामतिर्थ पोलिस ठाणे अंतर्गत आटकळी येथे पोलिस चौकीचे उद्घाटन



लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे

बिलोली तालुक्यातील मौजे अटकळी येथे रामतिर्थ पोलिस ठाणे अंतर्गत अटकळी येथे पोलीस चौकीचे उद्घाटन फित कापुन ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक जगताप यांच्या हस्ते झाले यावेळी महापुरूषांच्या प्रतिमेच पूजन करण्यात आले आणि मान्यवराच शाल श्रीफळ पुष्पहाराने स्वागत करण्यात आले अटकळी हे नरसी देगलुर महामार्गावर असल्यामुळे पोलीस ठाण्यासाठी मध्यवर्ती ठिकाण आहे या गावालगत आदमपूर टाकळी खुर्द गळेगांव थडीसावळी खतगांव मिनकी या बिट अंतर्गत गावांतील नागरिकांना सोयीचे होईल असे ठिकाण म्हणून अटकळी येथे निवड करण्यात आली . उद्घाटन प्रसंगी अटकळीचे माजी सरपंच विनोद देशमुख सरपंच प्रतिनिधी शिवाजी पाटील डोंगरे उपसरपंच रणविर डोंगरे शिवसेना जिल्हा संघटक विजय मुंडकर बिटजमादार जांबळीकर पत्रकार विलास शेरे पत्रकार दयानंद भद्रे पत्रकार काशिनाथ वाघमारे,वंचित बहुजन आघाडी चे तालूका महासचिव अमोल शेरे शिवलिंग गायकवाड भास्करराव भालेराव,बिट अंतर्गत गावातील संरपच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनंत चतुर्दशी निमित्त ७५ पूरग्रस्तांना लायन्स इंटरनॅशनल ने पाठविले १८ वस्तूंचे सहायता किट

लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड । बाजीराव गायकवाड



लॉयन्स् क्लब नांदेड सेंट्रल चे अध्यक्ष शिवाजी पाटील,झोनल चेअरपर्सन शिवकांत शिंदे, प्रोजेक्ट चेअरमन धर्मभूषण ड.दिलीपभाऊ ठाकूर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले असून योग्य वेळी मदत मिळाल्याबद्दल पूरग्रस्तांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले.

नांदेड मध्ये आलेल्या भीषण महापूरा मुळे शेकडो लोकांचे अतिशय नुकसान झाले. घरात पाणी शिरल्यामुळे नित्योपयोगी साहित्य वाहून गेले. अन्नधान्याची नासाडी झाली. लायन्स प्रांतपाल गिरीश सिसोदिया, पूर्व प्रांतपाल जयेशभाई ठक्कर, रिजनल चेअरमन रवी कडगे यांच्या पुढाकारातून लायन्स इंटरनॅशनल ने दहा हजार डॉलरचा तातडीचा निधी मंजूर केला. त्या निधीतून प्रत्येकी पंधराशे रुपये किमतीचे किराणा सामान,भांडे, कपडे व छत्री असलेले किट तयार करण्यात आले आहे. प्राथमिक स्वरूपात या किट वाटपाचा शुभारंभ यापूर्वीच मनपा आयुक्त डॉ. डोईफोडे आणि लायन्स प्रांतपाल गिरीश सिसोदिया, उपप्रांतपाल प्रथम आश्विन बाजेरिया, उपप्रांतपाल द्वितीय राहुल औसेकर, प्रांत सचिव रितेश छोरिया, रीजनल चेअर पर्सन रवी कडगे, कॉर्डिनेटर ड. दिलीप ठाकूर,पूर्व प्रांतपाल जयेश ठक्कर, दिलीप मोदी, नारायण कलंत्री,ड.प्रवीण अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला होता. तयार केलेल्या किट लायन्स क्लबच्या विविध शाखे मार्फत वाटप करण्यात येत आहेत. गुजराती हायस्कूल येथे लायन्स क्लब नांदेड सेंट्रल च्या वतीने किट वाटप करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक करताना दिलीप ठाकूर यांनी पूर आल्यानंतर सलग पाच दिवस वाटप करण्यात आलेल्या लायन्सच्या डब्यासह इतर उपक्रमाची माहिती दिली.यावेळी शिवाजीराव पाटील, शिवकांत शिंदे यांची समायोचित भाषणे झाली.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन लायन्स सचिव गौरव दंडवते यांनी तर आभार कोषाध्यक्ष दीपेश छेडा यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी क्लब सदस्य लक्ष्मीकांत कळणे ,अमित वाघमारे ,सुबोध बोंबीलवार ,ओमप्रकाश कामिनवार, प्रवीण जोशी, सुरेश शर्मा, अरुणकुमार काबरा, कामाजी सरोदे, विजय वाडेकर,प्रसाद जोशी,सविता काबरा यांनी परिश्रम घेतले. यावेळी अनेक पूरग्रस्त उपस्थित होते. सर्वजण गणेश विसर्जन मिरवणुकीत व्यस्त असताना देखील लायन्सने आपल्या सेवा धर्माचे पालन करत योग्य वेळी योग्य मदत दिल्याबद्दल लायन्स परिवाराचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## चारोळी

मनाच्या गाभाऱ्यात
संवेदना जपून ठेव
तरच भेटेल तुला
माणसा माणसातील देव.

रंजना सानप
मायणी (सातारा)

## मंगळवेढ्यात मनसे केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**पंढरपूर**-आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी करण्यास सुरुवात केली आहे. यातच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने देखील आगामी निवडणुकीसाठी तयारी सुरू केली असल्याचे दिसत आहे. मंगळवेढा मतदारसंघातील मनसे नेते व उमेदवार दिलीप धोत्रे यांनी रविवारी मनसे केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन केले आहे.

## राष्ट्रवादी शरद पवार गटाचे कंधार-लोहा विधानसभा अध्यक्षपदी शिवशंकर धोंडगे यांची निवड

लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार । धोंडीबा मुंडे



राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद चंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर झाल्यापासून जिल्ह्यातील राष्ट्रवादी पक्षात नव चैतन्य निर्माण झाले आहे,अनेक लोकांना पक्षात प्रवेश करून घेण्याचा धडाका अध्यक्षांनी चालू केला आहे अनेक स्तरावरील नियुक्त केल्या जात आहेत कंधार लोहा विधानसभा अध्यक्षपदी शिवशंकर पाटील धोंडगे यांची निवड करण्यात आली निवडी प्रसंगी जिल्हा अध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर प्रा.डी.बी जांभूळकर डॉ. परशुराम वरपडे सुभाष गायकवाड प्रा.मजदरीन गजानन पाम्पटवार पुंडलिक कर्हाळे नितीन वाघमारे प्रभाकर पवार संजय वडवळे रेखाताई राहेर आदींच्या उपस्थितीत त्यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांची निवड करण्यात आली त्यांच्या या निवडीबद्दल तालुक्यातून राष्ट्रवादी पक्षाला बळकटी मिळणार आहे,

# माझ्या विरोधात अनेक जण लढून थकले,आता कोणालाही येऊ द्या

लोकनेता न्यूज नेटवर्क

जळगाव (वृत्तसंस्था)

जळगाव जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का देण्याची तयारी शरद पवार करत आहेत. मंत्री गिरीश महाजन यांच्या विरोधात भाजपचे नेते तथा जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष दिलीप खोपडे यांना शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची शिवस्वराज्य यात्रा ही २१ तारखेला जळगाव जिल्ह्यात दाखल होणार आहे. या यात्रेदरम्यान खोपडे यांचा पक्षप्रवेश होणार असल्याची माहिती देखील समोर आली आहे. मात्र, खोपडे यांच्या प्रश्नावर गिरीश महाजन यांनी काहीही बोलण्यास नकार दिला आहे. गेल्या सहा टर्मपासून माझ्या विरोधात अनेक जण लढून थकले आहेत. आता कोणालाही येऊ द्या, अशा शब्दात गिरीश महाजन यांनी खोपडे यांच्या प्रश्नावर प्रत्युत्तर दिले. गणपती बाप्पाचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे. त्याला काय करायचे हे माहिती आहे. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीचे सरकार मोठ्या मताधिक्यात येणार असल्याचा दावा देखील मंत्री गिरीश महाजन यांनी केला आहे. दिलीप खोपडे यांच्याबाबत बोलण्यात मात्र त्यांनी नकार दिला. गेल्या सहा टर्म पासून आपल्या विरोधात अनेक जण लढा देऊन थकले आहेत. आता कोणालाही येऊ द्या, घोडा आणि मैदान समोरच आहे. निवडणूक संपल्यावर माझ्याशी बोला, अशी प्रतिक्रिया गिरीश महाजन यांनी माध्यमांना दिली आहे.दिलीप खोपडे हे जळगाव जिल्ह्यातील मराठा नेते म्हणून ओळखले जातात. जामनेर मतदार संघात मराठा समाजाचे एक लाख ४० हजार मतदार आहेत.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा लावण्यात आलेला फोटो ग्रामसेवक यांच्या सांगण्यावरून काढून टाकले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे पोखर्णी येथे १७ सप्टेबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त ग्रामपंचायत कार्यालय पोखर्णी सकाळी ध्वजारोहण करीत असताना ग्रामसेवक श्री. व्ही. एन. शंकरे व सरपंच सौ. गंगाबाई प्रकाश बोडके यांनी जातीय द्वेषातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची फोटो काढून टाकण्यात आली. १७ सप्टेबर मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून शासकीय वेळेनुसार ध्वजारोहण करताना राष्ट्रपिता महात्मा गांधी, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ग्रामपंचायत सेवकांनी ठेवली आसता जातीय द्वेषातून जाणीवपूर्वक ग्रामसेवक पी एन शंकरे ग्रामसेवक सरपंच सौ गंगाबाई प्रकाश बोडके हे ग्रामपंचायत सदस्य भीमराव नागोराव वाघमारे यांच्या समक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा ठेवलेली असताना हटविण्यात आले त्यांनी लगेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची फोटो ठेवलेले ते हटविण्यास सांगितले आहे परंतु भिमराव वाघमारे यांनी लगेच विरोध केले आहे विरोधाला नजुमानता ग्रामसेवक सरपंच स्वतः मनाई करुन फोटो काढून टाकण्यात आले त्यामुळे पोखर्णी येथील ग्रामस्थासह आंबेडकरी अनुयायांचे भावना दुखावल्या प्रकरणी व महापुरुषांचा अपमान केल्या प्रकरणी ग्रामसेवक यांना निलंबित करण्याच्या मागणीसाठी उपविभागीय अधिकारी मॅडम, गटविकास अधिकारी पंचायत समिती बिलोली , बिलोली पोलीस ठाणे यांना निवेदन देण्यात आले आहे यावेळी गौतम भालेराव, सुबोध साबुकवार, भीमराव वाघमारे, गणेश जटाळकर, नागनाथ बोडके, अशोक भालेराव, कुणाल भालेराव, राम जठाळकर, चंद्र डुमणे, लक्ष्मण भालेराव, यादव भालेराव , अजिंक्य भालेराव, गौतम दाऊ भालेराव, राम भालेराव ,नागेश भालेराव ,विनोद भालेराव, जयपाल भालेराव, भीमराव संभाजी वाघमारे, चंद्रकांत आंबेडकर, रिपब्लिकन सेना गंगाधर ईबितकर संजय नागोराव जाधव पंढरीनाथ गायकवाड, बाळासाहेब लाखे, आदी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.



## रामतीर्थ जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव | प्रतिनिधी**



मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून रामतीर्थ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने सरपंच सौ.मनीषा राजेश तोडे यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

प्रारंभी महामानवाच्या प्रतिमेचे पूजन करून मुक्ती संग्राम दिनानिमित्त रामतीर्थ येथील सरपंच सौ मनीषा राजेश तोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण केल्यानंतर ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपसरपंच सौ जयश्री मुरलीधर देगलूरे,संतोष पाटील पुयड,संतोष भक्तापुरे,बाबुराव वाघमारे शालेय समिती अध्यक्ष,मारुती योगे उपाध्यक्ष, भारतबाई वाघमारे अंगणवाडी शिक्षिका, मुख्याध्यापक श्री पवळे,शिक्षकवृंद श्रीराम पाटील वजीरगावे,सौ.अरुणा वाघमारे,जयशीला कांबळे, पदाधिकाऱ्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय सहभागी संस्थेच्या अध्यक्षा लक्ष्मी गायकवाड उपाध्यक्ष विजय रानडे, सचिव सौ अंजना डांगे कोषादक्ष नवनाथ सूर्यतळ, सदस्य सविता बोयाळ,लक्ष्मी सूर्यवंशी यांची यासह चेअरमन,पोलीस पाटील व गावातील नागरिकांची उपस्थिती होती.

## ईद मिलादुन्नबी निमित्ताने भव्य महा रक्तदान शिबिराचे आयोजन वर्ष ११ वे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार सरोवर | विनायक कुटे**

जगाला शांतीचा व मानवतेचा संदेश देणारे इस्लाम धर्माचे पैगंबर हजरत मोहम्मद (सल्लाहो अलैही व सल्लम )यांच्या जयंती निमित्ताने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी स्थानिक इंदिरा गांधी उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज लोणार येथे जमीयत उलमा -ए हिंद च्या वतीने भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन दिनांक १६/०९/२०२४ सोमवार ला करण्यात आले होते यामध्ये शहरातील सर्व समाजातील एकूण १२० युवकांनी रक्तदान केले. रक्तदान शिबिराला लोणार पोलीस ठाण्याचे ठाणेदार मेहेत्रे साहेब,आबेद खान (नगर सेवक), इम्रान खान (प्रदेश अध्यक्ष



शिवसेना अल्पसंख्यांक विभाग )ज्येष्ठ समाज सेवक हाजी महेमूद सेठ, जफर खान साहब, जमीर सेठ,इम्रान खान साहब,गफूर भाई, विदर्भ पोलीस प्रशिक्षण केंद्राचे संचालक निसार सर, मुख्याध्यापक शेख तौफिक सर, अन्नू सर यांनी भेट देऊन आयोजकांचे कौतुक केले. सदर शिबिराला यशस्वी करण्यासाठी जमियत चे शहर अध्यक्ष हाफिज आयाज, हाफिज तारिक, हाफिज अब्दुल राजिक, हाफिज एहतेशाम, रिजवान खान, वसीम सर, नईम खान सर, अब्दुल खालिक सर,अल्ताफ सर,अलीम सर, मोहम्मद जकी, मोहम्मद सोहिल, फैसल खान, अब्दुल रहेमान, फुरकान खान, व इतर जमियत च्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सर्व रक्तदात्यांचे व कार्यकर्त्यांचे हाजी मोहम्मद रिजवान (जड्डा ) जनरल सेक्रेटरी जमियत उलमा -ए हिंद लोणार यांनी आभार व्यक्त केले.

# स्टोन क्रशरवर कारवाई करण्यास टाळाटाळ करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी करा-हनुमंत जांबले

## जिल्ह्यातील मोठ्या महसूल अधिकाऱ्याच्या संपत्तीची चौकशी केल्यास करोडो रूपयांचे सापडणार घबाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड | बबनराव धायतोंडे**

वासुंदे,जळगाव,पांढरेवाडी ता.दौंड येथील स्टोन क्रेशर मध्ये पुणे जिल्ह्यातील एका शासकीय महसुल अधिकाऱ्याची भागीदारी असल्याची चर्चा दौंड तालुक्यात जोरदार चालू आहे. हाच महसुल अधिकारी खडी क्रेशर मध्ये बरोबरीत भागीदार असल्याने येथील खडी क्रेशर वरती कारवाई होण्यास टाळाटाळ होत असल्याची चर्चा दौंड तालुक्यात रंगू लागली आहे. आणि याच जिल्ह्यातील मोठ्या महसूल अधिकाऱ्यानी येथील स्टोन क्रशर च्या हिश्यातुन करोडो रुपयांची बेनामी संपत्ती कमावलेली आहे.म्हणून त्यांच्या आणि नातेवाईकांच्या संपत्तीची चौकशी व्हावी अशी मागणी हनुमंत जांबले यांनी केली आहे.

या बड्या अधिकाऱ्यांच्या संपत्तीची चौकशी केल्यास फार मोठे घबाड सापडण्याची शक्यता हनुमंत जांबले यांनी वर्तवली आहे. वासुंदे गावात प्रचंड मोठ्या प्रमाणात उत्खनन होऊन देखील आणि महापारेषानचा टॉवर(मनोरा) पडण्याच्या परिस्थितीत असून देखील कारवाई होत नाही, याचाच अर्थ या कारवाईला टाळाटाळ करणारा चाणाक्ष मेंदू याच बड्या अधिकाऱ्याचा आहे अशी चर्चा वासुंदे परीसरात जोर धरू लागली आहे.

संबधित स्टोन क्रशर मालकांकडून निर्धारित केलेल्या प्रमाणापेक्षा अधीक पटीने जास्त गौणखनिज उत्खनन होत असुन,गेली कित्येक वर्षे करोडो रुपयांचा महसूल बुडवला जात आहे. या प्रकरणी स्थानिक प्रशासकीय अधिकार्यांच्या संगनमताने करोडो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे, याची चौकशी व्हावी. ५०० ते ७०० कोटी रुपयांची रॉयल्टीची शासनाची फसवणूक केली आहे.तसेच बोअर ब्लास्टींग ची कुठलीही परवानगी नसताना सदर क्रशर कंपन्यांकडून सर्रास बोअर ब्लास्टींग चा वापर केला जात आहे,जे की अत्यंत गंभीर आणि घातक असून प्रचंड धोक्याचे आहे.

स्टोन क्रशर च्या आवारातून(वरूनच) अतिउच्च वीज वाहिनी गेलेली असताना देखील,वीज वाहिनी च्या प्रतिबंधीत क्षेत्रात बेकायदेशीर पणे उत्खनन होत असून,भविष्यात फार मोठी जिवीत व वित्त हानी याच बेकायदेशीर प्रकारामुळे होऊ शकते,जे की अत्यंत गंभीर आहे.प्रदुषण नियंत्रणाचे सर्व नियम धाब्यावर बसुन राजरोसपणे होणाऱ्या उत्खननामुळे परिसरातील जमीन,पाणी,शेती,जैवविविधता,दैनंदिन लोकजीवन विस्कळीत झाले आहे.सदर स्टोन क्रशर मालकांच्या मनमानी कारभाराबाबत वारंवार वासुंदे ग्रामपंचायत प्रशासन,ग्रामस्थ,पत्रकार यांनी आवाज उठवून देखील,गेली अनेक वर्षे हा गोरखधंदा राजरोसपणे चालु आहे. सदर प्रकारामध्ये महसूल विभागाने जातीने लक्ष घालुन स्टोन क्रशर कंपन्यांवर योग्य ती कारवाई करून येथील नागरीकांना न्याय द्यावा,सदर बेकायदेशीर क्रुत्याला पाठिशी घालणाऱ्या संबधित अधिकार्यांवर देखील कायदेशीर कडक कारवाई करावी अशी मागणी येथील ग्रामस्थ हनुमंत जांबले यांनी केली आहे.





## बिलोली तहसील कार्यालयात अनागोंदी कार भार तहसीलदार यांचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**

बिलोली तहसील कार्यालयात नायब तहसीलदार राजेश्वर पदमवार, पेशकर पाटील, ऑपरेटर नन्हेसाब कलम नं ३५३ ची भिती दाखवून राशन कार्ड, उत्पन्न, रहिवासी, जातीचे प्रमाणपत्र पैसे दिल्याशिवाय मिळत नाही बिलोली तहसील कार्यालयात पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार पद्मवार, पुरवठा पेसकार पाटील, ऑपरेटर नन्हेसाब तीन कर्मचारी गोर गरीब जनतेचे काम करत नसून दलालांचे व पैसे देणा-यांचे काम केले जात आहेत तसेच आंतोदया राशन कार्ड करण्यो साठी ५००० हाजार रुपये घेऊन डुप्लिकेट लाभार्थी ला अंतोदय कार्ड देत आहेत. तहसील कार्यालयात फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार चालु आहे तसेच उत्पन्न रहिवासी जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी पण पैसे घेत आहेत. पैसे दिले नाही तर कोणतेच काम करत नाहीत यावर वरिष्ठ अधिकारी जातीने लक्ष घालून भ्रष्टाचार करणारे पुरवठा विभागाचे नायब तहसीलदार पद्मवार साहेब, पुरवठा विभागाचे पेसकर पाटील साहेब, ऑपरेटर नन्हेसाब तीन कर्मचारी भ्रष्टाचाराने रंगुन गेले असुन ते गोर गरीब जनतेचे नागरिकांचे कामे करण्यास टाळाटाळ करत. तरी दररोज अनेक दाखले मिळण्यासाठी तहसील कार्यालयाचे दार पायपीट करावी लागत आहे या कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी अन्यथा लोकशाही मार्गाने झोडपो आंदोलन करण्यांत येईल याची नोंद घ्याळवी असे निवेदन उपविभागीय अधिकारी मॅडम, बिलोली तहसीलदार साहेब देण्यात आले यावेळी रिपब्लिकन सेना युवा जिल्हा महासचिव नांदेड सुमेध वाघमारे, रिपब्लिकन सेना तालुका अध्यक्ष बिलोली गौतम गावंडे, रिपब्लिकन सेना बिलोली शहराध्यक्ष गंगाधर ईबितकर, ग्रामपंचायत सदस्य मारोती कांबळे, बेळकोणी खुर्द चे सरपंच प्रतिनिधी सुजित कांबळे, माधव भोसले, किर्तीकुमार डोंगरे, प्रदिप गावंडे, दिपक केसराळीकर, प्रविण केसराळीकर, दत्ता शिळेकर, आदींनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

## आंबुलगा,वाखरड,मुंडेवाडी येथील रस्त्यांच्या विकासकामांचा धुमधडाक्यात शुभारंभ

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार | धोंडीबा मुंडे**



जागतिक पातळीवर आपला दबदबा निर्माण करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी,रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विकास कामाची दूरदृष्टी आहे.सामान्य जनतेच्या प्रश्नाची जाण आहे.त्यांच्या विकास धोरणामुळे व राज्यातील महायुती सरकारच्या बळामुळे मुखेड-कंधार मतदारसंघात विकास कामांचा धडाका सुरु आहे असे प्रतिपादन भाजपाचे आ.डॉ. तुषार राठोड यांनी केले आहे.

आ.राठोड यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या ६४ कोटींच्या विविध कामांचे भूमिपूजन, लोकार्पण पेठवडज गटात दि.१५ सप्टेंबर रोजी करण्यात आले. यावेळी आ.राठोड बोलत होते.

मतदार संघातील पहिले गाव म्हणून ज्याचा उल्लेख आहे, अशा वाखरड येथे आंबुलगा,वाखरड,मुंडेवाडी येथील रस्त्यांचे सुधारणा करण्यासाठी ७ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. उमरदरीकर, श्याम महाराज जोंी, लक्ष्मणराव पाटील खैरकेकर, आंबुलग्याचे माजी सरपंच माधवराव मुसळे,जि.प.चे माजी सदस्य मनोहर पाटील तेलंग,पं.स.चे माजी सदस्य गिरधारी केंद्रे,विश्वासराव पाटील वडजे,पंजाबराव वडजे, व्यंकट लोहबंदे, गंगाधर पिटलेवाड, लालबा पाटील शिंदे,वाखरड-वाखरडवाडीचे सरपंच ज्ञानेश्वर मुंडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. तसेच पेठवडज ते येलूर या रस्त्यांचे रुंदीकरण,डांबरीकरण अर्थसंकल्पीय तरतुदीतून करण्यात येणार आहे.तसेच पेठवडज गावांतर्गत ३ कोटींच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यांचे बांधकाम करण्यात येणार आहे. नाबार्डच्या माध्यमातून नारनाळी गावालगत मोठया पुलाचे बांधकाम पूर्ण झाले असून या पुलाचा लोकार्पण सोहळा आ.डॉ. तुषार राठोड यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी आ.राठोड म्हणाले की, विकास कामासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. मतदार संघातील अनेक गावांचे प्रश्न सोडवू. महायुती सरकार आपल्या पाठिशी ठामपणे उभे आहे.आपणही महायुती व भाजपाच्या सोबत राहा म्हणजे विकासाला आणखी गती मिळेल. यावेळी बालाजी पाटील तेलंग,शरद पाटील तेलंग,दत्ता मुंडे,धोंडीबा मुंडे,भानू पाटील,श्रीपती मुंडे, सुभाष अभंगे,भगवान शिंदे, बाबुराव शिंदे,बाबुराव शिंदे,पिंटू अभंगे, येशमोड शंकर,विश्वाभर शिंदे, धोंडीबा शिंदे, मन्मथ शिंदे,गंगाधर अभंगे,जयसिंग शिंदे,राजू गायकवाड, माधव अभंगे,भानू पाटील,व्यंकट नागरवाड संभाजी पाटील वडजे सीताराम गुरुजी,राम देवकांबळे,संभाजी वडजे, विजय सिरसे,पंडित देवकांबळे,यशवंत पाटील, राजमुद्रा ग्रुप सर्व सदस्य, महिला,पुरुष मोठया संख्येने उपस्थित होते. जिल्हा परिषद कंधारचे अभियंता कचरे व जाधव यांच्याही उपस्थिती होती.

# शासकीय आयटीआय उमरखेड येथे संविधान मंदिराचा लोकार्पण सोहळा संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरखेड । सय्यद रहीम राजा**

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था उमरखेड येथे संविधान मंदिराच्या ऑनलाइन उद्घाटनाचा सोहळा मा.उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचे हस्ते आंतरराष्ट्रीय लोकशाही दिनी दि.१५/०९/२४ रोजी सकाळी ११.३० वाजता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण झालेल्या एलफिन्स्टन टेक्नीकल हायस्कुल, मुंबई येथे संपन्न झाला

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण उमरखेड या संस्थेमध्ये आयोजित संविधान मंदिराचे उद्घाटन कार्यक्रमासाठी मा.आमदार श्री नामदेव ससाने उमरखेड महागाव , प्रा. डॉ.प्रेम हनवते प्रसिद्ध आंबेडकरी साहित्य संशोधक बार्टी पुणे , प्रा.डॉ. अनिल काळबांडे जागतिक मराठी साहित्यिक व आंबेडकरी चळवळीचे सामाजिक कार्यकर्ते , रामेश्वर जी बिचेवार आय एम सी सदस्य, श्री प्रकाश वाघमारे सामाजिक कार्यकर्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते .सामाजिक न्यायाची खरी शिकवण ही भारताच्या संविधानातून प्राप्त होत असल्यामुळे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागा अंतर्गत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था व शासकीय तांत्रिक विद्यालयामध्ये प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांना सामाजिक न्यायाची खरी शिकवण मिळावी यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा साहेब यांच्या संकल्पनेतून व मा.संचालक श्री सतीश सूर्यवंशी साहेब , मा. श्री प्रदीपजी घुले साहेब प्रादेशिक का. अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली संस्थेमध्ये दिनांक १२ सप्टेंबर ते १४ सप्टेंबर या कालावधीमध्ये संविधान महोत्सवाचे आयोजन व १५ सप्टेंबर रोजी संस्थेतील




संविधान मंदिराच्या उद्घाटनाचा सोहळा संपन्न झाला सदर कार्यक्रमाप्रसंगी मा. आमदार श्री नामदेव ससाने , डॉ. प्रेम हनवते साहेब, डॉ.अनिल काळबांडे साहेब, प्रकाश वाघमारे साहेब रामेश्वर बिचेवार व इतर उपस्थित इतर सर्व मान्यवरांचे संस्थेच्या वतीने स्वागत करण्यात आले .डॉ.प्रेम हनवते यांनी भारतीय संविधानाची गरज, संविधान निर्मितीचा इतिहास व संविधान निर्मिती या विषयावर सखोल मार्गदर्शन केले डॉ.अनिल काळबांडे साहेब यांनी भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत अधिकार कर्तव्य व जबाबदाऱ्या, संविधानाचे महत्त्व व गरज या विषयावर संस्थेतील सर्व प्रशिक्षणार्थ्यांना अतिशय मौलिक मार्गदर्शन केले .संस्थेचे प्राचार्य श्री डी पी पवार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये संस्थेतील सर्व प्रशिक्षणार्थ्यांना भारतीय संविधान व भारतीय नागरिकाचे कर्तव्य व जबाबदाऱ्या व सामाजिक बांधिलकी या विषयावर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमांमध्ये डॉ.भारत नांदुरे यांच्या संविधान जनजागृती अभियानाच्या हरघर संविधान या उपक्रमांतर्गत भारताचे संविधान या ३०० पुस्तिकेचे मोफत वाटप संस्थेतील सर्व प्रशिक्षणार्थी व कर्मचारी यांना करण्यात आले.सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थेचे गटनिदेशक श्री संजय खुटाफळे सर, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री आनंद कुंभारे सर यांनी केले व आभार प्रदर्शन श्री देशमुख सर यांनी केले सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील ,श्री परोपटे सर,निंबोळकर सर ,साबळे सर, चिंचाळे ,श्री कदम ,श्री भोसले, श्री इंगोले सर ,श्री शिंदेसर ,नरवाडे मॅडम कु.कवाने मॅडम ,निंबेकर मॅडम श्री नरवाडे सर श्री सोनुवळे, मयूर कुंभारे , श्री थोंबाळे सर,सूर्यवंशी श्री कांबळे श्री धुळे व संस्थेतील सर्व प्रशिक्षणार्थी व महिला प्रशिक्षणार्थी, यांनी अथक परिश्रम घेऊन सदर कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न केला सदर कार्यक्रमास परिसरातील प्रतिष्ठीत नागरीक, लोक प्रतिनिधी, संस्थेचे आजी-माजी विद्यार्थी, पालक, तसेच संविधानप्रेमी समाजसेवक व स्थानिक नागरिक , पत्रकार बांधव आणि संस्थेचे सर्व कर्मचारी वृद उपस्थित होते.

## अंजनी येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील मौजे अंजनी येथे दि १७ सप्टेबर अंजनी येथील ग्रामपंचायत कार्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. अंजनी गावचे सरपंच महेश पाटील हांडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले मराठवाडा मुक्ती संग्रामात शहीद झालेल्या जवानांना अभिवादन केले व तसेच महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण केले .यावेळी सरपंच महेश पाटील हांडे, तलाठी आनंदराव पाटील, ग्रामसेवक अविनाश हाळदेवाड, पोलीस पाटील राहुल हांडे, वनमजूर तेजेराव धानेकर, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष गोविंद हांडे, सलिम शेख, लखन हांडे, शंकर पुंजरवाड, शिवा बावलगावे, नझिर शेख आदींची उपस्थिती होती.



**उमरी शहरा मधील श्री गणपती विसर्जना निमित्त नायगाव मतदारसंघाचे युवा नेते संदीप पाटील कवळे यांनी सर्व गणेश मंडळाला भेटी दिल्या. अतिशय शांतपणे सर्व गणेश मंडळांच्या श्री गणेश विसर्जनांची मिरवणूक प्रमुख रस्त्याने काढण्यात आली.**



**मौजे जोमेगांव ता लोहा येथील श्री गणेशाची टाळ आणि मृदुंगाच्या गजरात, गावातील महिला,व पुरुष मंडळी, लहान मुल, मुली, अबाल वृध, मंडळीनी, भक्ती भावाने, निरोप दिला सदरिल मिरवणूक, । ना डिजे, ना पोलीस बंदोबस्त,,, अत्यंत शांततेत पार पडली**

## दीपभारती माध्य.व उच्च माध्य.विद्यालय माहोरा येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दानापूर । राम शिंदे**

या कार्यक्रमाप्रसंगी माहोरा गावचे सर्वप्रथम नागरिक सरपंच गजानन पाटील लहाने, उपसरपंच बाबासाहेब बोरसे, ज्येष्ठ भाजपा नेते भगवानराव लहाने, सुभाषराव लहाने ग्रा. सदस्य, भास्कर सोनवणे ग्रा. सदस्य, गडकरी अण्णा सा. का., नंदू बोर्डे मा.ग्रा.सदस्य, महमूद भाई पठाण, शंकर पा. लहाने, गुलाबराव कळम, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब गव्हले, पत्रकार राजू गौवरकर, पत्रकार गणेश कासोद, माहोरा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक, विजय इंगळे व आदी मान्यवर यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान शाळेचे मुख्याध्यापक श्री एस.के.पांडे सर यांनी भूषवले प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच हे होते. यावेळी शाळेचे यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन त्यांना करताना स्वामी रामानंद तीर्थ गोविंद श्रॉफ यांच्या मराठवाठाला मुक्ती मिळवण्यासाठी कोणता संघर्ष केला आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. यांनी हैदराबाद संस्थानाकडून आपण कसे विलीन झालो हे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोलटगावकर मॅडम यांनी केले, आभार दाभाडे सर यांनी मानले. कार्यक्रमासाठी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हजर होते.



## पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते मा.खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या निवासस्थानी गणरायाची आरती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

मा.खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या साई-सुभाष, वसंतनगर, नांदेड येथील निवासस्थानी राज्याचे ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री मा.ना.श्री गिरीशजी महाजन व राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार मा.श्री.अशोकरावजी चव्हाण यांच्या हस्ते श्री गणरायाची पूजा करून आरती करण्यात आली.



यावेळी खा. डॉ.अजित गोपछडे, आ. भीमराव केराम, आ. बालाजीराव कल्याणकर, मा. आ. अमरनाथ राजुरकर, मा.आ. सुभाषराव साबणे, मा.आ राम पाटील रातोळीकर, विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, महानगरपालिका आयुक्त महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, भारतीय जनता पार्टी प्रदेश सचिव देविदास राठोड, हिंगोली लोकसभा प्रमुख रामदास पाटील सोमठाणकर, भारतीय जनता पार्टी ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतुकराव हंबर्डे, ग्रामीण जिल्हाध्यक्ष एडवोकेट किशोर देशमुख, भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यकारी सदस्य चैतन्यबापू देशमुख, धर्मराज देशमुख, बालाजीराव बच्चेवार, बाळू खोमणे, जनार्दन ठाकूर, अरविंद भारतीया, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे महानगराध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## नीरा नरसिंहपूर येथे गणेश विसर्जना साठी गेलेला मुलगा नदीपात्रात बुडाला

### हर्षवर्धन पाटील यांचेकडून शोध कार्यासाठी सूचना

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

श्री क्षेत्र नीरा नरसिंहपूर (ता.इंदापूर) येथे नीरा नदी पात्रात श्री गणेश विसर्जनासाठी गेलेला मुलगा बुडाल्याची घटना मंगळवारी (दि.१७) दुपारी घडली. अनिकेत विनायक कुलकर्णी ( वय - १६ वर्षे, रा.परांडा तालुका) असे दुर्दैवी मुलाचे नाव आहे.सदरची घटना माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना दुपारी समजतात तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून,दुर्दैवी मुलाच्या युद्धपातळीवर शोधकार्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. इंदापूरचे तहसीलदार,पोलीस निरीक्षक,घटनास्थळी




दाखल झाले आहेत.

नीरा नरसिंहपूर येथे वेद अध्यायन शिकविणाऱ्या पाठशाळेत अनिकेत कुलकर्णी हा शिकत होता.गणेश विसर्जनासाठी नदीपात्रात तो इतर मुलांसह गेला असता सदरची दुर्दैवी घटना घडली.पोलीस घटनास्थळी दाखल होत असून, होडीतून व पाण्यात बुड्या घेऊन सदर मुलाच्या सध्या शोध घेतला जात आहे.माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी या दुर्दैवी घटने संदर्भात बारामतीचे उपविभागीय अधिकारी यांच्याशी व स्थानिक कार्यकर्त्यांशी संपर्क साधून मदत कार्याच्या सूचना दिल्या आहेत.या दुर्दैवी घटनेबद्दल हर्षवर्धन पाटील यांनी दुःख व्यक्त केले आहे.

## विझोरा येथील कृषि महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन साजरा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**वालसावंगी । कौतिक हिवाळे**

भोकरदन तालुक्यातील विझोरा येथील छत्रपती श्री शिवाजी महाराज कृषी महाविद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिनसाजरा करण्यात आला. त्या निमित्ताने सरदार वल्लभभाई पटेल आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतीमेला हार घालून त्यांना अभिवादन करून मराठवाडा मुक्ती संग्राम दिन साजरा करण्यात आला. यावेळी वेळेस महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य श्री. एम .एम. सोळंकी, श्री एस के भोपळे, श्री व्ही. व्ही. शेवारे, आर. एस जाधव तसेच प्रमुख पाहुणे म्हणून स. प्रा.अभिनाश गवळी , स.प्रा गोपाल लाठे, श्री गोपाल लेणेकर, श्री जगन्नाथ आढाव , योगेश कानडजजे , व विद्यार्थी इत्यादी. महाविद्यालयाचे कर्मचारी उपस्थित होते.



**दानापूर येथे ढोल ताशांच्या पारंपारिक वाद्यात गणपती बाप्पांना निरोप..**




**महाराष्ट्राला आत्मभान आणि प्रबोधनाची दिशा देणारे, क्रांतीकारी विचारवंत प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करताना शिवसेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक एकनाथ दादा पवार,माजी सभापती सतिश सोळंके, शिवसेना तालुका प्रमुख सचिन पेठकर, कंधार-लोहा प्रसिद्ध निवेदक विक्रम पाटील,युवासेना तालुका समन्वयक रहीम खान, दिगंबर उगले उपस्थित होते.**

# एकनाथ शिंदे सारखा जातीवादी मुख्यमंत्री या पूर्वी कधीही महाराष्ट्रात झाला नाही- नवनाथ वाघमारे

## ओबीसी आंदोलक नवनाथ वाघमारे यांना प्रशासनाने आंतरवली सराटीच्या वेशीवरच आडवले

### जरांगे मुख्यमंत्र्याचा बाप आहे – नवनाथ वाघमारे

**यावेळी माध्यमांशी बोलताना नवनाथ आबा वाघमारे असे म्हणाले की जरांगे मुख्यमंत्र्याचा बाप आहे त्यामुळे ते त्यांना विनापरवाना आंदोलन करू देतात आमच्या कडे निवेदनाची प्रत आहे आम्ही परवानगी मागितली आहे तरीही आम्हाला आडवले जात आहे, जातीवादी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे प्रशासनावर दबाव टाकत आहेत, एकनाथ शिंदे रातोरात चुकीचे निर्णय घेऊन ओबीसी समाजाच्या पाठीत खंजीर खुपसणार आहेत असे नवनाथ आबा वाघमारे यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले आहे.**

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**जालना | प्रतिनिधी**

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण द्यावे या मागणीसाठी मनोज जरांगे हे गेल्या वर्षभरापासून वाटेल तेव्हा उपोषणाला बसतात आणि उठतात. मात्र आंतरवली सराटीच्या वेशीवरच म्हणजे वडीगोद्री या गावामध्ये काही दिवसांपूर्वी प्रा लक्ष्मण हाके सर व नवनाथ आबा वाघमारे यांनी बोगस कुणबी नोंदी रद्द करून ओबीसी मध्ये होणारी घुसखोरी तसेच महाराष्ट्रात होत असणारी अशांतता थांबवावी या मागणीसाठी प्रा लक्ष्मण हाके सर व नवनाथ आबा वाघमारे यांनी वडीगोद्री या गावामध्ये आमरण उपोषण केले. या नंतरही प्रा लक्ष्मण हाके सर



व नवनाथ आबा वाघमारे यांनी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरा करून ओबीसी समाज एकजूट करण्याचा प्रयत्न केला. मात्र मनोज जरांगे यांच्या आंदोलनाकडे सरकारने जेवढे गांभीर्याने पाहिले तेवढे गांभीर्याने ओबीसी आंदोलनाकडे पाहीले नाही. यामुळे महाराष्ट्रातील ओबीसी समाजात प्रचंड रोष पहायला मिळत आहे. याच पाश्र्वभूमीवर मनोज जरांगे जिथे उपोषणाला बसतील तिथे आम्हीही दुसऱ्या दिवशी उपोषणाला आहोत अशी घोषणा प्रा लक्ष्मण हाके सर व नवनाथ आबा वाघमारे यांनी केली होती यामुळे आंतरवली सराटी येथे मनोज जरांगे पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत त्यामुळे नवनाथ आबा वाघमारे आंतरवली येथे उपोषणाला जात असताना पोलिस प्रशासनाने त्यांना आंतरवली सराटीच्या वेशीवरच आडवले आहे. यामुळे ओबीसी समाजा कडून या घटनेचा व मुख्यमंत्री शिंदे यांचा तीव्र निषेध करण्यात येत आहे.



# आदर्श विद्यालयाचे गणेश विसर्जना निमित्त विविध देखावे सादर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सिंदखेड राजा | प्रतिनिधी**

शिक्षण शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचलित आदर्श मराठी प्राथमिक विद्यामंदिर आज येथे आज गणेश विसर्जन मिरवणुकीने मोठ्या उत्साहात संपन्न झाली यावेळी आदर्श मराठी प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यामंदिर, आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आदर्श कॉन्व्हेंट ज्ञानपीठ सिंदखेड राजा यामधील सर्व विद्यार्थ्यांनी वर्गनिहाय विविध देखावे सादर करून समाज प्रबोधनपर संदेश या मिरवणूकीच्या दरम्यान दिला.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री सुभाष मोरे सर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. त्यानंतर प्रसादाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर रामायण, शेतकरी आंदोलन, थोर पुरुषांच्या वेशभूषा,भारत मातेचे रक्षण, पलभट्टी, कावड यात्रा, देवी दर्शन खंडोबाची काठी अश्या प्रकारच्या विविध देखावे सादर केले होते.सदर मिरवणुकीत सर्व वर्गाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. तसेच ड. संदीप मेहेत्रे व श्री. नरुभाऊ तायडे सामाजिक युवा नेते यांनी विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. पालकांनी शाळेच्या सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत व कौतुक केले.



# लोकरत्न पुरस्कार–२०२४ ने डॉ.राजेंद्र सानप सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन बीड येथे देशभक्त स्वांतत्र्य सैनानी, भारतीय संविधान समिती चे सदस्य माजी मंत्री पद्मश्री डॉ.रत्नाप्पा कुंभार यांच्या ११५ व्या जयंती निमित्त अ.भा.कुंभार समाज विकास संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. गेल्या ३० वर्षापासुन सार्वजनिक ग्रंथालय चळवळीतील उल्लेखनीय कार्याबद्दल लोकरत्न पुरस्काराने मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष व गुरूवर्य भगवान महाराज सार्वजनिक वाचनालय इंद्रप्रस्थ कॉलनी, बीडचे ग्रंथपाल डॉ.राजेंद्र सानप यांना सन्मानित करण्यात आले. या वेळी सावता परिषदचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस ओ.बी.सी.सेल प्रदेशाध्यक्ष कल्याणराव आखाडे व बारा बलुतेदार संघाचे अध्यक्ष कल्याणराव दळे, अ.भा.कुंभार समाज संस्थेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश उपाध्यक्ष महेशराव शिंदे, अ.भा.कुंभार समाज संस्थेचे बीड जिल्हाध्यक्ष रामदास कुंभार, मनोहर जगदाळे, भागवत वैद्य, सतिष दादा दरेकर, कैलास कुंभार यांच्या सह आदी मान्यवराची प्रमुख उपस्थिती होती.




# २४ सप्टेंबरला संगणक परिचारकांचा चलो ठाणे चा इशारा,मुख्यमंत्र्याच्या घरावर काढणार मोर्चा

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | राजू म्हस्के**

गेल्या१२ वर्षांपासून ग्रामविकास विभागाने संग्राम व आपले सरकार सेवा केंद्रच्या माध्यमातून राज्यातील २० हजार संगणक परीचारकांच्या वतीने राज्यसरकारच्या विविध योजना सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर काम करत असून परंतु या संगणक परिचारकाकडे शासनाने साफ दुर्लक्ष केले आहे ७ हजाराचा तुटपुंज्या मानधनावर आपली उपजीविका भागत नाही म्हणून त्यात ३ हजार रुपयेची वाढ करून १० हजार रुपये केली परंतु ती राज्याच्या निधीतून न करता ग्रामपंचायत स्वनिधीतुन करण्यात आली आहे,याला ग्रामपंचायतचा विरोध असल्याने संगणक परीचारकांची दयनीय अवस्था आई जेवू घालीना, बाप भीक मागून देईना अशी झाली आहे असून उपासमारीची वेळ त्यांच्यावर आली आहे,संगणक परिचालक यांनी दि. १९ जून २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील ग्रामउद्योजक हा शब्द हटवून सर्व संगणक परिचालकांना संगणक परिचालक म्हणून ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा देऊन किमान वेतन देण्यात यावे. जुलै महिन्यापासून करण्यात आलेली १० हजार रुपयांची मानधन वाढ कोणतीही सबब न देता विना अट त्वरित अदा करण्यात यावी. झालेली मानधन वाढ दर महिन्याला एक निश्चित तारखेला देण्यात यावी. शासनाने महा आयटी कंपीनीशी १ जुलै २०२४ पासून करार केलेला आहे.

राज्यातील सर्व ग्रामपंचायत संगणक चालकांना नियमित करून कोणालाही कामावरुन काढून टाकण्यात येणारं नाही याची लेखी हमी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.या मागण्या त्वरित मान्य करण्यात याव्यात अश्या मागण्याचे निवेदन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले आहे.

**मुख्यमंत्री साहेब तुम्ही लाडकी बहीण योजना आणली त्यासाठी आम्ही रात्रंदिवस काम करून ती योजना बहिणी पर्यंत पोहचवली, त्यांचा लाभ त्यांना मिळवून दिला मग जवळपास २० हजार संगणक परिचारक बहिण भाऊ तुमचे लाडके नाहीत का? मग आमच्यावर हा अन्याय का?**

**निद्रिस्त सरकारला जागे करण्यासाठी राज्यातील ग्रामपंचायतमधील कॉम्प्युटर ऑपरेटर यांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन मागणीकरिता मुख्यमंत्राच्या घरावर मोर्चा काढण्यात येणार आहे. यावेळी सरकारने सकारात्मक निर्णय न घेतल्यास येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत सरकारला संगणक ऑपरेटरच्या रोषाला सामोरे जावे लागेल.**

**कृष्णा डोरले ,आष्टी ता.उपाध्यक्ष–संगणक परिचालक संघटना महा. राज्य.**

# ज्ञानेश्वर मोरेंच्या रुपातिल पोलिस खात्याचा कोहिनूर हिरा हरपला

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

अहमदनगर शहरात कार्यरत असलेला ज्ञानेश्वर मोरे हा पोलीस कर्मचारी सध्या कोतवाली पोलिस ठाण्यात कार्यरत होते काल कोतवाली पोलिस ठाण्याच्या गणपती विसर्जन मिरवणुकीत मोरे यांनी नाचण्याचा खुप आनंद लुटला हा आनंद फार वेळ टिकला नाही परंतु नियतीला काही वेगळंच मंजूर होत हा आनंद कधी दुःखात बदलला हे कोणालाच समजले नाही वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले त्यांचा अंत्यविधी भिंगार या मुळ गावी शोकाकुल वातावरणात पार पडला आणि क्षणांत होत्याच नव्हत झाले श्री मोरे यांच्या मागे पत्नी एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे गणेश विसर्जनाच्या आनंदावर अच्यानक दुःखाचं सावट कोसळले त्यामुळे अहमदनगर शहरांसह संपूर्ण जिल्ह्यातिल पोलिस प्रशासनाला तिव्र दुःख झाले आहे कै मोरे यांना श्रीगोंदा पोलिस स्टेशन च्या



वतिने भावपूर्ण श्रद्धांजली आर्पीत करण्यात आली तर कर्जत पोलिस स्टेशन च्या वतिने पोलिस खात्याचा एक कोहिनूर हिरा हरपला अशा शब्दांत भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण केली तर काही पोलिस कर्मचाऱ्यांनी एक दोस्तीच्या दुनियेतील दिलदार व्यक्ती महत्व हरपल्याची खंत व्यक्त केली कै.ज्ञानेश्वर मोरे यांना लोकनेता न्युज नेटवर्क च्या वतिने व महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ श्रीगोंदा तालुक्याच्या वतिने विषेश भावपूर्ण श्रद्धांजली.

# श्रीगोंदा पोलीसांची नेत्र दिपक कामगीरी पैशांसाठी खोटे लग्न् करुन फसवणारी टोळी केली जेरबंद

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा | ज्ञानेश्वर येवले**

/–मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला साहेब, मा. अपर पोलीस अधिक्षक श्री. प्रशांत खैरे सो, व मा.उप विभागीय पोलीस अधिकारी, कर्जत विभाग श्री. विवेकानंद वाखारे सो, व मा. पोलीस निरीक्षक श्री. किरण शिंदे सो यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संपत कन्हेरे यांचे पथकामधील पोना/गोकुळ इंगावले, पोकों/संदिप शिरसाठ, पोकॉ/आनंद मैड, पोकों/संदिप राऊत व मपोकों/प्रमिला उबाळे यांनी श्रीगोंदा पोलीस स्टेशन गु.रजि.नं. ०८३८/२०२४ भारतीय न्याय संहिता कायदा २०२३ चे कलम ३१८(४), ३०३(२), ३(५) प्रमाणे दाखल गुन्हयातील आरोपी १) नवरीचा बनावट रोल करणारी एक महीला २) नवरीच्या बहिणीचा रोल करणारी एक महीला ३) नवरीच्या दाजीचा रोल करणारा इसम विठठल किसन पवार वय–३७ वर्षे रा. महालक्ष्मी खेडा, पो. सावखेडा जि. संभाजीनगर ४) नवरीच्या काकाचा रोल करणारा इसम ज्ञानेश्वर लक्ष्मण



दाभाडे वय–४५ वर्षे रा. धुपखेडा ता. पैठण जि. संभाजीनगर यांचा शोध घेत असताना तांत्रिक तपास व गुप्त बातमी दारामार्फत माहीती मिळाल्याने सदर आरोपींत मजकुर यांना संभाजीनगर येथील वेगवेगळया ठिकाणाहून सापळा रचुन त्यांना अटक केले असून त्यांच्या इतर साथीदारांचा सहभाग निष्पन् करुन त्यांचा शोध सुरु आहे. तसेच त्यांचेकडून ५,००,०००/–रुपये किंमतीची मारुती सुझुकी इको व्हॅन जप्त करण्यात आली असून त्यांना दि.१६/०९/२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्यांना आज दि. १७/०९/२०२४ रोजी श्रीगोंदा कोर्टात हजर केले असता त्यांना सात दिवस पोलीस कोठडी रिमांड मिळाले आहे राज्यात असे अनेक प्रकार घडत असताना लाखो रुपयांची फसवणूक होत आहे त्यामुळे भविष्यात लगणाळु तरुणांनी आपली फसवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन श्रीगोंदा पोलीसांकडून करण्यात येत आहे. सदर गुन्हयाचे तपासात दक्षिण मोबाईल सेल नेमणुकीचे पोकॉ/ राहुल गुंडु व पोकों/नितीन शिंदे यांची मदत मिळाली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोना/ गोकुळ इंगावले हे करीत आहे.

## लोहा शहरात गणपती विसर्जन मोठ्या उत्साहात संपन्न

# लोहा न.पा.चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांनी केले उत्कृष्ट नियोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा | विशाल घंटे**

लोहा शहरात दि.१७ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणपती विसर्जन मोठ्या उत्साहात संपन्न झाले असुन या गणेश विसर्जनासाठी लोहा न.पा.चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांनी केले उत्कृष्ट नियोजन.

लोहा शहरात दि.७ सप्टेंबर रोजी गणेश चतुर्थीच्या दिवशी नोंदणीकृत २५ गणेश मंडळांनी श्री गणेशाची स्थापना केली तर विना परवाना छोटे –मोठे जवळपास १०० गणेश मंडळांनी श्री गणेशाची स्थापना केली होती. १० दिवस मोठ्या भक्तिभावाने श्री गणेशाची आराधना करून ११ व्या दिवशी श्री गणेशाला निरोप देण्यासाठी त्यांचे मोठ्या भक्तिभावाने लोहा शहरातून ढोल ताशा च्या गजरात मिरवणूक काढून सुनेगाव तलावात श्री गणेशाचे मोठ्या भक्तिभावाने आरती करून विसर्जन करण्यात आले.



यावेळी लोहा न.पा.च्या प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी सौ.अरुणा संगेवार, प्रभारी मुख्याधिकारी तथा तहसीलदार विठ्ठल परळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोहा न.पा.चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड यांनी सुनेगाव तलाव येथे श्री गणेशाच्या विसर्जनासाठी एक घाट तयार करून भोई समाज बांधव यांना पाचारण करुन तराफ्याच्या सहाय्याने श्री गणेश विसर्जन केले तसेच रस्त्यावरची खड्डे गिट्टच्या चुरीने बुजविले तसेच रात्रीला अंधारात श्री गणेशाचे विसर्जन करण्यासाठी अनेक लाईटचे फोकस लोहा न.पा.च्या वतीने लावले होते तसेच श्री गणेश भक्तांना शुध्द फिल्टर पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.श्री गणेश विसर्जनासाठी लोहा.न.पा. चे कार्यालयीन अधीक्षक उल्हास राठोड हे स्वतः सुनेगाव तलावावर उपस्थित होते तसेच त्यांच्या सोबत लोहा न.पा.च्या स्वच्छता निरीक्षक लताबाई ढवळे, रावसाहेब नळगे , विठ्ठल दाढेल, विष्णू भिसे, आदी कर्मचारी उपस्थित होते. तसेच पो. नि. ओमकार चिंचोळकर यांनी ही चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. यावेळी पो.उ. पाटील, पोलीस कर्मचारी कारामुंगे,डी.बी.शाखेचे प्रदीपकुमार शेबांळे आदी पोलिस कर्मचारी उपस्थित होते.


हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904